# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 15 August 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १५ ऑगस्ट २०२४ सकाळी ७.१० मि.

****

**आमच्या सर्व श्रोत्यांना ७८ व्या स्वातंत्र्यदिनाच्या हार्दिक शुभेच्छा**

****

- देशभरात स्वातंत्र्यदिनाचा उत्साह, दिल्लीत लाल किल्ल्याच्या तटबंदीवर पंतप्रधानांच्या हस्ते ध्वजारोहण
- राजकीय लोकशाहीला सामाजिक लोकशाहीचा आधार – राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन
- स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने शौर्य आणि सेवा पदकांची घोषणा, राज्यातल्या ५९ कर्मचाऱ्यांचा समावेश
- राज्यात पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं आवाहन
- हिंगोली तसंच वाशिम जिल्ह्यातल्या महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा पहिला हप्ता वितरीत

आणि

- राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाचे चित्रपट पुरस्कार जाहीर

****

देश आज आपला ७८ वा स्वातंत्र्यदिन साजरा करत आहे. दिल्लीत स्वातंत्र्यदिनाच्या मुख्य राष्ट्रीय सोहळ्यात थोड्याच वेळात ऐतिहासिक लाल किल्ल्याच्या तटबंदीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते ध्वजारोहण करण्यात येईल, त्यानंतर पंतप्रधान देशवासियांना संबोधित करतील. या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी केंद्र सरकारनं देशभरातून समाजातल्या विविध क्षेत्रातल्या नागरिकांना आमंत्रित केलं आहे. यामध्ये

महाराष्ट्रातल्या १२३ जण असून, त्यांच्यामध्ये छत्रपती संभाजीनगरच्या सारिका धन्यकुमार जैन, जालना जिल्ह्याच्या बदनापूर तालुक्यातल्या ढासला ग्रामपंचायतीचे सरपंच राम पाटील आणि त्यांच्या पत्नी वर्षाराणी पाटील, परतूर तालुक्यातले रमेश भापकर आणि त्यांच्या पत्नी पूजा भापकर यांचा समावेश आहे.
ध्वजारोहण समारंभाचं थेट प्रक्षेपण आकाशवाणीच्या दिल्ली केंद्रावरून सकाळी सात वाजेपासून प्रसारित होईल.

**

मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मंत्रालयात, तर राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते पुण्यात विधान भवन इथं, सकाळी नऊ वाजून पाच मिनिटांनी ध्वजारोहण होणार आहे. राज्यभरात सकाळी आठ वाजून पस्तीस मिनिटं ते नऊ वाजून पस्तीस मिनिटं, या वेळेत इतर कोणताही शासकीय किंवा निमशासकीय समारंभ आयोजित करण्यात येऊ नये, असं राजशिष्टाचार विभागानं कळवलं आहे. राज्यपाल राधाकृष्णन यांनी राज्यातल्या जनतेला स्वातंत्र्य दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

****

राजकीय लोकशाहीला सामाजिक लोकशाहीचा आधार आवश्यक असल्याचं, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. काल स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात त्या बोलत होत्या. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक लोकशाहीचं सांगितलेलं महत्त्व त्यांनी अधोरेखित केलं. त्या म्हणाल्या...

> ***"हमें संविधान निर्माता डॉक्टर बी.आर. आंबेडकर के शब्दों को भी सदैव याद रखना चाहिए। उन्होंने ठीक ही कहा था, 'हमें अपने राजनीतिक लोकतंत्र को सामाजिक लोकतंत्र भी बनाना चाहिए। राजनीतिक लोकतंत्र तब तक नहीं टिक सकता जब तक कि उसके आधार में सामाजिक लोकतंत्र न हो।''***

कृषी, क्रीडा, अंतराळशास्त्र, पायाभूत सुविधा, महिला सक्षमीकरण, सामाजिक न्याय, आदी विषयांवर राष्ट्रपतींनी भाष्य केलं. जागतिक तापमान वाढीवर उपायासंदर्भात भारत करत असलेल्या उपायांचं त्यांनी कौतुक करत, नागरिकांनाही या क्षेत्रात योगदान देण्याचं आवाहन केलं.

****

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने पोलीस, अग्निशमन, होमगार्ड, नागरी सुरक्षा आणि सुधारणा सेवेतल्या एकंदर एक हजार ३७ कर्मचाऱ्यांना, शौर्य आणि सेवा पदकांची घोषणा काल करण्यात आली. यात महाराष्ट्रातल्या विविध सेवांमध्ये कार्यरत असलेल्या ५९ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. अतिरिक्त पोलीस महानिरीक्षक अनुज तारे यांना शौर्यपदक जाहीर झालं आहे. तर अतिरिक्त महासंचालक चिरंजीव प्रसाद, संचालक राजेंद्र डहाळे आणि सहायक पोलीस आयुक्त सतीश गोवेकर यांना परमसेवा पदक घोषीत झालं आहे. छत्रपती संभाजीनगर इथं कार्यरत सहाय्यक पोलीस उप निरीक्षक द्वारकादास भांगे यांना प्रशंसनीय सेवेसाठीचं पदक जाहीर झालं आहे.

****

राज्यात पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा, असं आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं आहे. काल मुंबईत झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. राज्यात सर्वत्र गणपती आगमन आणि विसर्जन मार्गांवरचे खड्डे तातडीने बुजवावेत, कृत्रिम तलावांची संख्या वाढवावी, आदी निर्देशही त्यांनी दिले. गणेशोत्सवासाठी गावी जाणाऱ्या गणेश भक्तांना यंदाही पथकर माफीची घोषणा मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली आहे.

****

अन्न आणि नागरी पुरवठा विभागानं जुलै आणि ऑगस्ट महिन्याचं धान्य वितरण ऑफलाईन पद्धतीने करण्यास मान्यता दिली आहे. गेल्या काही दिवसात ई-पॉस यंत्राच्या तांत्रिक अडचणीमुळे राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेच्या लाभार्थींना धान्य वितरण होऊ शकत नव्हतं. याकडे सरकारचं लक्ष वेधून घेण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेतल्या दुकानदारांनी निदर्शनही केली होती. तांत्रिक अडचणीमुळे हे लाभार्थी अन्नधान्यापासून वंचित राहू नयेत, यासाठी सरकारने हा निर्णय घेतला आहे.

****

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा पहिला हप्ता हिंगोली जिल्ह्यात सेनगाव तालुक्यातल्या सवना इथल्या अनुराधा नायक, कुशर्वता नायक या दोघांच्या खात्यावर जमा झाला आहे. याबद्दल त्यांनी सरकारचे आभार मानले.

***“मी अनुराधा पद्माकर नायक. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या माध्यमातून मला आज तीन हजार रुपये हप्ता जमा झाला आहे. योजनेनुसार***

***आम्हाला घर ग्रहस्थी सांभाळण्यास मदत होणार आहे, म्हणून मी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांचे मनापासून खूप खूप आभार मानते. काही महिलांचे फॉर्म भरायचे राहीलेले आहेत, त्यांना सुद्धा मनापासून आवाहन करते की त्यांनीही मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या योजनेचा लाभ घ्यावा.''***

वाशिम जिल्ह्यातही मुख्यमंत्री माझी बहीण लाडकी योजनेच्या पात्र लाभार्थी महिलांच्या बँक खात्यामध्ये काल तीन हजार रुपये जमा झाले. स्वातंत्र्य दिन आणि रक्षाबंधन यांच्या पार्श्वभूमीवर मिळालेल्या या अनुदानामुळे महिलांमध्ये आनंदाचं वातावरण असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाचे चित्रपट पुरस्कार काल जाहीर झाले. चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते शिवाजी साटम यांना, आणि स्वर्गीय राज कपूर जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख यांना जाहीर झाला आहे. चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार लेखक, दिग्दर्शक, अभिनेता दिग्पाल लांजेकर यांना, तर स्वर्गीय राज कपूर विशेष योगदान पुरस्कार ज्येष्ठ लेखक, दिग्दर्शक, संकलक एन.चंद्रा यांना जाहीर झाला आहे.

****

धाराशिव जिल्ह्यात नळदुर्ग इथं अमृत योजनेच्या दुसर्या टप्प्याअंतर्गत मंजूर नवीन पाणी पुरवठ्याच्या विविध कामांचं भूमिपूजन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते काल करण्यात आलं. या योजनेमुळे शहराला दररोज पाणी मिळेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

****

हर घर तिरंगा मोहिमेअंतर्गत काल बीड जिल्ह्यातल्या चिंचपूर जिल्हा परिषद शाळेच्या वतीनं पंचाहत्तर मीटर लांबीच्या तिरंगा ध्वजाची मिरवणूक काढण्यात आली.

परभणीतही शहर महानगरपालिका, महसूल प्रशासन, पोलीस प्रशासन आणि शिक्षण विभागांनी तिरंगा रॅलीचं आयोजन केलं होतं. यावेळी जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी तिरंगा अभियानाची शपथ दिली. महानगरपालिका आणि शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने काल चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. ३०० विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला होता.

**

छत्रपती संभाजीनगर इथं जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या उपस्थितीत काल जिल्हाधिकारी कार्यालयातल्या सगळ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना तिरंगा ध्वज वितरीत करण्यात आला, प्रत्येकानं देशाला सर्वतोपरी मानून देशाप्रति आपलं कर्तव्य बजावण्यास प्राधान्य द्यायला हवं असं मत स्वामी यांनी यावेळी व्यक्त केलं.

****

विभाजन विभिषिका स्मृती दिनाच्या औचित्यानं दक्षिण मध्य रेल्वेच्या वतीने काल नांदेड रेल्वे स्थानकावर फाळणीसंदर्भात माहिती देणारं प्रदर्शन लावण्यात आलं होतं. विभागीय प्रबंधक नीती सरकार यांच्या हस्ते या प्रदर्शनाचं उद्घाटन झालं. अनेक नागरिकानी या प्रदर्शनाला भेट दिली.

****

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची शिव स्वराज्य यात्रा काल लातूर जिल्ह्यात दाखल झाली .या यात्रेदरम्यान मराठा आंदोलकांनी खासदार सुप्रिया सुळे यांचा ताफा अडवत ,मराठा समाजाला ओबीसींमधून आरक्षण देण्याच्या मागणीसाठी पक्षाची भूमिका स्पष्ट करावी अशी मागणी केली. त्यानंतर अहमदपूर इथं देखील सुळे यांची सभा सुरु असताना मराठा आंदोलक थेट मंचावर चढले आणि माईकचा ताबा घेऊन, ही मागणी केली.

****

नांदेड जिल्ह्यातल्या लोहा पंचायत समितीला आयएसओ मानांकन प्राप्त झालं आहे. लोहा पंचायत समितीने केंद्र तसंच राज्य शासनाच्या महत्त्वाच्या उपक्रमात प्रभावी अंमलबजावणी, परिणामकारक पर्यवेक्षण, लाभार्थ्यांना तत्पर सेवा, झिरो पेंडन्सी अशा विविध बाबीवर विशेष लक्ष केंद्रीत केलं आहे. अशा प्रकारचा बहुमान मिळवणारी ही जिल्ह्यातली दुसरी पंचायत समिती ठरली आहे.

****

जलशक्ती अभियानातंर्गत सुरु असलेल्या "कॅच द रेन" मोहिमेत सर्व यंत्रणांनी सहभागी होवून, धाराशिव जिल्हयात ती सक्षमपणे राबवावी, असे निर्देश जलशक्ती अभियानाचे संचालक अशोककुमार यांनी दिले आहेत. काल धाराशिव इथं यासंदर्भातल्या बैठकीत बोलताना त्यांनी, या मोहिमेला गती प्राप्त करुन देण्यासाठी महिलांचा सहभाग वाढवण्याची गरजही व्यक्त केली.

****

श्रमजीवींचं मन आणि जगणं वामनदादा कर्डक यांनी आपल्या लेखणीतून मांडलं, असं मत ज्येष्ठ समीक्षक ऋषिकेश कांबळे यांनी व्यक्त केलं आहे. कर्डक यांच्या जयंतीनिमित्त काल छत्रपती संभाजीनगर इथं डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातल्या लोककवी वामनदादा कर्डक अध्यासन केंद्रात झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. केंद्र संचालक दासू वैद्य यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

****

इतर मागास बहूजन कल्याण विभागाच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती नागरिकांना देवून त्याचा लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहचवण्याकरता धाराशिव जिल्यात तालुकास्तरीय मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं आहे. हा मेळावा आजपासून तीन सप्टेंबरपर्यंत राबवण्यात येणार आहे.

****